MHLA050000602019

## नियमीत दिवाणी दावा क्र.७/२०१९ मधील नि.क्र.९२ खालील आदेश
## [ अनुसया ..वि.. महाराष्ट्र शासन व इतर ]

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम-६ नियम-१७ अन्वये दिलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार सदरचा दावा हा हक्क ज्ञापनासाठी दाखल असुन वादीने त्यामध्ये स्वत:चा जबाब दिलेला आहे आणि तिचा उलटतपासही झालेला आहे. त्यानंतर दिनांक २४/११/२०२१ रोजी वादी आणि प्रतिवादी क्र.५ यांच्या दरम्यान नोटरी वाटणी पत्र झाले. त्यामध्ये दोन्ही पक्षकारांनी प्रथम आणि द्वितीय पत्नी कोण आहे हे त्या वाटणीपत्रात मान्य केले आहे. सदरचा दस्त नि.क्र.६९ लगत या प्रकरणी दाखल केलेला आहे. त्यामुळे तो दस्त पुराव्यात वाचणे आवश्यक आहे. यास्तव त्या दस्ताच्या अनुषंगाने आवश्यक असलेला मजकूर वादपत्रामध्ये नमुद करणे गरजेचे झाले आहे. वादपत्र परिच्छेद क्र.४ च्या पुढे ४अ असा नव्याने परिच्छेद नमुद करुन त्यामध्ये या नोटरी दस्ताचा उल्लेख आणि त्याअनुषंगाने आवश्यक असलेला मजकुर लिहीण्याची दावा दुरुस्ती वादी या अर्जाने मागु इच्छीतात. अर्जाच्या सहाय्यार्थ नि.क्र.९३ लगत वादीने स्वत:चे शपथपत्र दाखल केले आहे.

३. प्रतिवादी क्र.५ तर्फे नि.क्र.९५ लगत या अर्जावर आपले म्हणणे देण्यात आले. त्यांच्या कथनाप्रमाणे वादीचा अर्ज हा जाणिवपुर्वक केलेला बनाव असल्याने तो खर्चासह रद्द करावा. वादीने स्वत:सह अन्य साक्षीदारांचा जबाब दिलेला आहे. दाव्याची चौकशी सुरु होण्यापुर्वी असा दुरुस्ती अर्ज वादी का देऊ शकले नाहीत याबद्दल त्यांनी कांहीच सांगितलेले नाही. वादीने दाव्यात प्रतिवादी क्र.५ चे पहिले पत्नी म्हणुन असलेले स्थान आक्षेपीत केले आहे.

तडजोड करण्याच्या उद्देशाने प्रतिवादी क्र.५ व तिच्या मुलांना वादीने औरंगाबाद येथे बोलाविले आणि खोटे व बनावट वाटणीपत्र तयार करुन घेतले व त्यावर प्रतिवादी क्र.५ व तिच्या मुलांच्या सहया व अंगठे घेतले. सदर बनावट वाटपपत्राबद्दल वादीच्या वकिल मुलाने तडजोडपत्र तयार करतेवेळी प्रतिवादी क्र.५ ला माहिती झाली. त्यामुळे तडजोडपत्र या प्रकरणी दाखल करण्यात आले नाही. या बनावट वाटणीपत्रातील मजकूर बदलावा अशीही विनंती प्रतिवादी क्र.५ ने केली होती. तो वादींनी बदलला नाही म्हणुन वादी अनुसया, मंगेश जगताप, मनोज जगताप यांच्याविरुध्द प्रतिवादी क्र.५ ने व तिच्या मुलांनी फौजदारी खटला दाखल केला आहे. सदर वाटपपत्र हे बनावट असल्याने त्याबद्दलचा मजकूर दाव्यात नमुद करण्यात येऊ नये. वादीने तत्परतेने याबद्दल न्यायालयात कांहीही कळविले नसल्याने अर्ज नामंजुर करावा अशी विंनती करण्यात आली आहे.

४. याकामी माझया विचारार्थ येणारे मुद्दे त्यावरील निष्कर्षासह खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दि.प्र.सं. क्रम-६ नियम-१७ अन्वये वादीने निकषांचे पालन करुन सदर अर्ज दिला आहे काय ? | : | **नकारार्थी.** |
| २. | वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | : | **नकारार्थी.** |
| ३. | कोणता आदेश ? **....अंतिम आदेशाप्रमाणे.** | | |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ बाबत:-**

५. वादींतर्फे युक्तिवादामध्ये विधीज्ञांनी नमुद केले की, वादी दाव्यात नमुद करु इच्छीत असलेल्या दस्ताबद्दलचा मजकूर हा दिनांक २४/११/२०२१ रोजीच्या दस्ताचा आहे. त्यामध्ये अत्यंत स्पष्टपणे वादीचे स्थान प्रतिवादींनी

मान्य केलेले आहे. सदरच्या दस्ताची प्रत याकामी नि.क्र.७० सोबतच्या यादीने दाखल केलेली आहे. त्यामुळे हा दस्त हा दाव्यातील महत्वाचा दस्ताऐवज आहे. त्यावर पुरावा देणे वादीस भाग आहे. म्हणुन दाव्यात दुरुस्ती करणे व त्यानंतर पुरावा देणे आवश्यक असल्याने अर्ज मंजुर करावा.

**६.** प्रतिवादीतर्फे युक्तिवादात विधीज्ञांनी यादीसह अन्य साक्षीदार तपासुन झाले असल्याने वादी अशा स्वरुपाची दुरुस्तीच मागु शकत नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

**७.** याकामी दाव्यातील कांही घटनांचा तपशील खालीलप्रमाणे तक्त्यात नमुद केला आहे.

| **अ.क्र.** | **दाव्याची पायरी** | **दिनांक** |
|---|---|---|
| १. | दावा दाखल | ०७/०२/२०१९ |
| २. | प्रतिवादी क्र.५ तर्फे कैफियत | ०५/०४/२०१९ |
| ३. | प्रतिवादी क्र.४ तर्फे कैफियत | ०५/०९/२०१९ |
| ४. | मुद्दे | ०८/०७/२०२० |
| ५. | दाव्यात पहिली दुरुस्ती | २५/०९/२०१९ |
| ६. | वादीचे सरतपासाचे शपथपत्र दाखल | १७/०३/२०२१ |
| ७. | वादीचा सरतपास पुर्ण | २६/०८/२०२१ |
| ८. | वादीचा उलटतपास सुरु व पुर्ण | २०/०७/२०२३ ते १७/१०/२०२३ |
| ९. | वा.सा.क्र.२ लक्ष्मीचा सरतपास दाखल | १७/०३/२०२१ |
| १०. | वा.सा.क्र.३ बालाजीचा सरतपास दाखल | १७/०३/२०२१ |
| ११. | वा.सा.क्र.३ बालाजीचा उलटतपास पुर्ण | ०५/०२/२०२४ |
| १२. | वा.सा.क्र.४ व्यंकटरावचा सरतपास दाखल | १६/०३/२०२४ |
| १३. | वा.सा.क्र.४ व्यंकटरावचा उलटतपास पुर्ण | ०८/०७/२०२४ |
| १४. | वा.सा.क्र.५ गणपतरावचा सरतपास दाखल | २३/०७/२०२४ |
| १५. | वा.सा.क्र.५ गणपतरावचा उलटतपास पुर्ण | २१/०८/२०२४ |
| १६. | वा.सा.क्र.६ कालिदासराव सरतपास दाखल | ०८/१०/२०२४ |
| १७. | नि.क्र.९२ हा प्रस्तुत अर्ज दाखल | ०८/१०/२०२४ |

८. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम-६ नियम-१७ अन्वये न्यायालय कोणत्याही घडीला दाव्यामध्ये उभय पक्षकारांना आपआपल्या वादकथनांमध्ये दुरुस्ती करण्यास योग्य त्या अटी व शर्तींवर परवानगी देऊ शकते. मात्र सदरची दुरुस्ती ही उभय पक्षांमधील निश्चीत मतभेदांचे निराकरण करण्यास उपयुक्त असली पाहिजे. याच नियमाच्या परंतुकाप्रमाणे दाव्याची चौकशी सुरु झाल्यानंतर असा दुरुस्तीचा अर्ज, जोपर्यंत न्यायालय या मतास पोहचत नाही की योग्य ती सर्व खबरदारी घेऊनसुध्दा सदर दुरुस्ती अर्ज संबंधीत पक्षकाराला दाव्याची चौकशी सुरु होण्यापुर्वी देणे अशक्य होते, मंजुर करु नये.

९. वर नमुद तक्त्यामध्ये दाव्याच्या महत्वाच्या घडामोडी व त्याच्या तारखा नमुद आहेत. त्यानुसार दाव्यामध्ये मुद्दे निघाल्यानंतर दाव्याची चौकशी सुरु होते. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या ***ए.एन.पांडे ..वि.. स्वामी केशव प्रकेशदासजी वगैरे, २००७ ए.आय.आर. सर्वोच्च न्यायालय, ८०६*** या निकालामध्ये परिच्छेद क्र.५७ मध्ये विशीष्टपणाने नमुद आहे की, मुद्दे काढल्यानंतर दावा हा पुरावा नोंदविण्याकरीता सुरु होतो म्हणजेच दाव्याची चौकशी सुरु होते. त्यामुळे वादी, प्रतिवादींनी जी दुरुस्ती दाव्यात किंवा कैफियतीत मागायची ती दाव्याची चौकशी सुरु होण्यापुर्वीच मागावी.

**१०.** दि.प्र.सं. क्रम-६ नियम-१७ मधील परंतुकानुसार अशी दुरुस्ती मागणा-या पक्षाने, ती दुरुस्ती आपण सर्व ती खबरदारी आणि जाणिवा जागृत ठेवून विहीत मुदतीत मागु शकलो नाही याचे स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे. निव्वळ नियमामध्ये न्यायालयात कोणत्याही पायरीला दुरुस्तीचा अर्ज देता येतो असे नमुद असल्याने तो कधीही दिला तर चालेल असे नाही.

**११.** याकामी मुद्दे निघाल्यानंतर म्हणजे दिनांक ०८/०७/२०२० नंतर वादीने स्वत:चे शपथपत्र दिनांक १७/०३/२०२१ रोजी दिले. वादीचा

सरतपास दिनांक २६/०८/२०२१ रोजी पुर्ण झाला आणि उलटतपास दिनांक २०/०७/२०२३ रोजी सुरु झाला. प्रस्तुतच्या अर्जामध्ये वादीने जे वाटणीपत्र नमुद केले आहे. त्याची तारीख २४/११/२०२१ अशी आहे. म्हणजेच वादीचा उलटतपास सुरु होण्यापुर्वी सदरचे तथाकथित वाटणीपत्र झाल्याची बाब वादीस माहित होती. अशा परिस्थितीत, उलटतपास सुरु होण्यीपुर्वी वादीने या तथाकथित वाटणीपत्राबद्दल कुठेही चकार शब्द उच्चारलेला नाही. दिनांक २४/०१/२०२२ रोजी वादी यांनी नि.क्र.६९ हा अर्ज देऊन सदर वाटणीपत्राबद्दल स्पष्ट उल्लेख या अर्जात केलेला आहे. सदर अर्जातील पान क्र.२ वर या वाटणीपत्राच्या अनुषंगाने वादींनी उल्लेख केलेला आहे. तसेच वाटणीपत्राचा दस्त नि.क्र.७० या कागद यादीसोबत त्याच दिवशी म्हणजे दिनांक २४/०१/२०२२ रोजी वादीने दाखल केलेला आहे. तेंव्हापासुन वादीचा उलटतपास संपेपर्यंत या दस्ताबद्दल वादीने दाव्यात कांहीही दाद मागितली नाही.

**१२.** वादीचे एकंदरीत पाच साक्षीदार तिच्यानंतर तपासण्यात आले. त्यापैकी कालिदासराव बोराटे या सहाव्या साक्षीदाराचा सरतपास वादीने दिनांक ०८/१०/२०२४ रोजी दाखल करण्यापुर्वी प्रस्तुतचा नि.क्र.९२ चा अर्ज दाखल केला. म्हणजेच वादी हिला तथाकथित वाटणीपत्राची माहिती दिनांक २४/११/२०२१ रोजी असताना, ते वाटणीपत्र दिनांक २४/०१/२०२२ रोजी न्यायालयात दाखल केले असताना त्याबद्दल कांहीही दाव्यात नमुद करणे वादीस गरजेचे वाटले नाही यावरुन वादी ही योग्य ती खबरदारी घेऊन किंवा परिश्रम घेऊन ( due diligence ) सदर अर्ज दाखल करत नाही हे सुस्पष्ट आहे.

**१३.** वर नमुद ***ए.एन.पांडे ..वि.. स्वामी केशव प्रकेशदासजी वगैरे, २००७ ए.आय.आर. सर्वोच्च न्यायालय, ८०६*** या निकालातील निष्कर्ष हे याकामी

तंतोतंत लागू होतात. मा. सर्वोच्च न्यायालयापुढे सुध्दा त्या प्रकरणामध्ये प्रतिवादीने कैफियतीमध्ये तीन साक्षीदारांचा जबाब पुर्ण झाल्यावर दुरुस्ती मागितली होती, जी नामंजुर करण्यात आली. याही प्रकरणामध्ये वादीने स्वत:सह पाच साक्षीदारांचा उलटतपास पुर्ण झाल्यानंतर सहाव्या साक्षीदाराच्यावेळी सदर दुरुस्ती मागितली आहे. त्याही पुढे वादीने ती दुरुस्ती मंजुर होणारच अशा अटकळीपोटी नि.क्र.९२ या अर्जासोबतच स्वत:चे अतिरीक्त सरतपासाचे शपथपत्र या दुरुस्ती अर्जातील मजकुराच्या अनुषंगाने लिहुन, अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, अहमदपूर यांच्यापुढे प्रमाणित करुन घेतले आहे. वादीचा अर्ज हा मुळात कायद्याच्या तरतुदीमध्ये बसत नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम-६ नियम-१७ मधील due diligence या शब्दास महत्व आहे. सदरचा अर्ज या प्रकारात येत नसल्याने मुद्दा क्र.१ आणि २ चे उत्तर नकारार्थी देण्यात येऊन मुद्दा क्र.३ च्या उत्तरात खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**:: आ दे श ::**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

**स्वाक्षरीत/-**

**दिनांक:१८/१२/२०२४.** **[ एस.एन.सरडे ]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.